मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवड महापालिका ठरली देशात पहिली!

## मुंबई शेअर बाजारात ग्रीन म्युनिसिपल बॉंडचे लिस्टींग; मुख्यमंत्र्यांनी केले प्रशासनाचे कौतुक

**पिंपरी | प्रतिनिधी**

“ग्रीन म्युनिसीपल बॉन्ड”च्या माध्यमातून पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात ग्रीन इन्फ्रास्ट्रक्चर तयार होण्यास मदत होणार आहे. 7.57 टक्के व्याजदाराने सदर बॉंड मिळाले आहेत. देशातील पहिली महापालिका ठरल्यामुळे केंद्र सरकारचा 20 कोटी रुपयांचा प्रोत्साहन निधी मिळणार आहे. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी कॅपिटल आणि बॉंड मार्केटमधून महानगरपालिकांना ॲक्सिस मिळावा, यासाठी आग्रही आहेत. त्यासाठीचा पहिला प्रयत्न पिंपरी-चिंचवड महापालिकेने यशस्वी केला आहे, असे मत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.




पिंपरी-चिंचवड महानरपालिकेच्या वतीने शहरात हरित सेतू व पर्यावरणपूरक विकास प्रकल्प राबवण्यासाठी आर्थिक स्त्रोत निर्माण करुन हरित कर्ज रोख्यांतून (ग्रीन बॉंड) सुमारे 200 कोटी रुपयांचा निधी यशस्वीरित्या उभारण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर बीएसई इंटरनॅशनल कन्व्हेंशन हॉल, मुंबई येथे ग्रीन म्युनिसीपल बॉंड लिस्टींग उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते करण्यात आले.

यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, विधान परिषद आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे, सुंदर रमण राममूर्ती, मुख्य सचिव सुजाता सौनिक, प्रधान सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव डॉ. के. गोविंदराज, ॲड. गोरक्ष लोखंडे, आयुक्त शेखर सिंह, प्रवीण जैन आदी उपस्थित होते.

**हरित कर्जरोख्यातून उभारला 200 कोटींचा निधी..**

हरित कर्ज रोखे (ग्रीन बॉंड) इश्यू करणारी पिंपरी-चिंचवड महापालिका देशातील पाहिली ठरली आहे. हरित कर्ज रोख्यातून महापालिकेने 200 कोटी रुपयांचा निधी उभारला आहे. गुंतवणुकदारांचा पिंपरी-चिंचवड महापालिकेवर असलेला विश्वास अधोरेखित करत, इश्यू सुरू होताच केवळ एका मिनिटांत 100 कोटी रुपयांचा मूळ भाग भरला गेला, तर एकूण 513 कोटी रुपयांच्या निविदा प्राप्त झाल्या, म्हणजेच रोख्याला 5.13 पट थिक मागणी मिळाली आहे. हरित कर्ज रोखा इश्यूला क्रिसिल आणि केअर या मान्यताप्राप्त पतमापन संस्थांकडून AA+ दर्जा मिळाला आहे. या रोख्यांचा कालावधी पाच वर्षांचा असून, त्यासाठी 7.85 टक्के स्पर्धात्मक व्याजदर निश्चित केला आहे.

### आयुक्त शेखर सिंह यांचे कौतुक..

» मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि सर्व प्रशासनाचे कौतूक केले. औद्योगिक क्षेत्राने आणि शेअरधारकांनी ‘ग्रीन म्युनिसिपल बॉंड’ला उत्तम प्रतिसाद दिला आहे. बॉंड लिस्टिंग झाल्यानंतर पहिल्या काही मिनिटांतच 100 कोटीहून अधिक सबस्क्रिप्शन झाले आहे. सदर बॉंडवर गुंतवणुकदारांचा विश्वास दिसत आहे. सुंदर रमण राममूर्ती यांनी बॉंड लिस्टिंगसाठी मंच तयार केला. बँकर्स, ऑडिटर्स, रेटिंगसाठी मेहनत घेणाऱ्या सर्व संस्थांचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी कौतूक केले.

---

# पिंपरी चिंचवड शहराचा पाणीपुरवठा गुरुवारी बंद राहणार

## गुरुवारी शहरातील सर्व भागातील संध्याकाळचा पाणी पुरवठा बंद राहणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी पिंपरी चिंचवड शहराचा पाणीपुरवठा गुरुवार (दि.१२ जून) रोजी बंद राहणार आहे. तसेच दुस-या दिवशी शुक्रवार (दि.१३ जून) रोजी सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होणार असल्याची माहिती महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने दिले आहे.



पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता-१ प्रमोद ओंभासे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड शहराच्या पाणी पुरवठा व्यवस्थेमध्ये खंड पडू नये याकरिता वेळोवेळी पाणीपुरवठा यंत्रणेतील देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेणे आवश्यक असते. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडील से.क्र.२३ येथील स्थापत्य विषयक तसेच विद्युत विषयक कामे करण्यात येणार आहेत.

तसेच क्षेत्रीय स्तरावरील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेतील स्थापत्य विषयक तसेच विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे आवश्यक आहे. त्यासाठी गुरुवार दि.१२/०६/२०२५ रोजी निगडी जलशुध्दीकरण केंद्रावरून होणारा पाणीपुरवठा बंद ठेवण्याचे नियोजन आहे.

त्या अनुषंगाने गुरुवार दि.१२/०६/२०२५ रोजी पिंपरी चिंचवड शहरातील सर्व भागातील संध्याकाळचा पाणी पुरवठा बंद राहील. तसेच दुस-या दिवशी शुक्रवार दि.१३/०६/२०२५ रोजी सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होईल. तरी नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा पुरेसा साठा करुन काटकसरीने पाणी वापर करून सहकार्य करावे असे आवाहन प्रमोद ओंभासे यांनी केले आहे.

# प्रदेशाध्यक्षपदाच्या जबाबदारीतून मुक्त करा

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटलांची शरद पवारांना विनंती

**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे दोन्ही गट आज (१० जून) त्यांचा २६ वा वर्धापन दिन साजरा करत आहेत. वर्धापन दिनानिमित्त दोन्ही गटांचे पुण्यात मेळावे आयोजित करण्यात आले आहेत. पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचा मेळावा चालू असून या मेळाव्यात पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधित करताना पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. त्यांनी पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्याकडे प्रदेशाध्यक्षपदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्याची विनंती केली आहे. तसेच आता नव्या चेहऱ्यांना संधी दिली पाहिजे असंही नमूद केलं.



जयंत पाटील म्हणाले, "मला शरद पवार यांनी अनेक संधी दिल्या आहेत. सात वर्षांचा कालावधी दिला. शेवटी पक्षाने नव्या चेहऱ्यांना संधी देणं आवश्यक आहे. मी तुमच्या सर्वांसमोर शरद पवार यांना एवढीच विनंती करेन... शेवटी हा पक्ष शरद पवारांचा आहे. त्यामुळे शरद पवार याबाबत निर्णय घेतील. आपल्याला बरंच पुढे जायचं आहे. आजवर मिळालेल्या संधीसाठी मी शरद पवारांचे आभार मानतो आणि तुम्हा सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचेही आभार मानतो".

### "...रणात झुंजणारे आहेत काही"

» शरद पवार यांना विनंती करण्यापूर्वी जयंत पाटील पक्षाच्या कार्यकर्त्यांचं मनोबल वाढवत म्हणाले, "एकेकाळी भारतीय जनता पार्टीचे देशात केवळ दोनच खासदार होते. आता तोच पक्ष देशातील सर्वात मोठा पक्ष बनला आहे. त्यामुळे कोणीही घाबरू नका. आपण सर्वजण ताकदीने कामाला लागलो तर या राज्याची लढाई पुन्हा एकदा जिंकू शकतो. करू नका चर्चा एवढ्यात पराभवाची, रणात झुंजणारे आहेत अजून काही".

### जयंत पाटील सात वर्षांपासून पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदावर

जयंत पाटील यांच्या या विनंतीनंतर आता ते प्रदेशाध्यक्षपदाच्या जबाबदारीतून मुक्त होणार का असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यांनी नवीन चेहऱ्यांना संधी देण्यास सुचवलं आहे. पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, खासदार व आमदारांच्या उपस्थितीत पाटील यांनी हे वक्तव्य केलं आहे. जयंत पाटील हे गेल्या सात वर्षांपासून पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदावर आहेत. पक्षातील एक अनुभवी व संयमी चेहरा आता या पदावरून पायउतार होऊ पाहतोय, अशा स्थितीत शरद पवार नेमका काय निर्णय घेणार, ते आता पक्षाची जबाबदारी कोणत्या नेत्याकडे सोपवणार असा प्रश्न सर्वांना पडला आहे.

---

# पक्ष्यांमुळे पुण्यातील हवाई उड्डाणांना अडथळे

## हवाई दलाने प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यास सुरुवात

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरून नियमित होणाऱ्या हवाई उड्डाणांना पक्ष्यांचा धोका कमी व्हावा, यासाठी हवाई दलाने पाच सदस्यांचे स्वतंत्र पथक स्थापन केले आहे. 'हाय डेसिबल झोन गन'ने पक्ष्यांना परिसरात येण्यास प्रतिबंधित केले जात आहे.

काही दिवसांपूर्वी विमानतळाच्या धावपट्टी परिसरात मोठ्या प्रमाणावर पक्षी असल्याने नियोजित उड्डाणांना तीन तास विलंब झाला. शुक्रवारी दिल्लीवरून पुणे विमानतळावर उतरणारे विमान पक्ष्यांच्या अडथळ्यामुळे दुसऱ्या मार्गावर वळवावे लागले. या घटनांच्या पार्श्वभूमीवर हवाई दलाने प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे.

या विमानतळावर हवाई दलाचा नियमित सराव सुरू असतो. येथून नागरी उड्डाणेदेखील वाढविण्यात आली आहेत. विमानतळाच्या परिसरात स्वच्छता राखण्यासाठी हवाई दलाने स्थानिक स्वराज्य संस्थांसह, जिल्हा प्रशासनाबरोबर बैठक घेऊन तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या होत्या. मात्र, अद्याप कुठलीच कार्यवाही झालेली नाही. अस्वच्छतेमुळे नागरिक मोठ्या प्रमाणावर कचरा टाकत आहेत. त्यामुळे पक्ष्यांचा अधिवास वाढला असून, त्याचा विपरित परिणाम विमानांच्या उड्डाणांवर होत आहे. हवाई दलाने उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र पथक स्थापन केले आहे.

### 'गॅसी फायर' प्रकल्प कोठे ?

विमानतळ परिसरात लोहगाव, येरवडा, वाघोली, लोणीकंद, केसनंद महानगरपालिका आणि ग्रामपंचायतींचा परिसर आहे. या परिसरात नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जातो. या पार्श्वभूमीवर महापालिकेने कचरा विघटनासाठी 'गॅसी फायर' प्रकल्प बसविण्यात येणार असल्याचे सांगितले होते. मात्र, त्याची अद्याप कार्यवाही झालेली नाही.




> विमानतळ परिसरातील पक्ष्यांमुळे हवाई उड्डाणांना अडथळे निर्माण होत आहे. त्या पार्श्वभूमीवर हवाई उड्डाणांच्या सुरक्षिततेसंदर्भात प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात येत असली, तरी आजूबाजूच्या परिसरातील कचऱ्याची चिंता कायम असून याबाबत महापालिका प्रशासनाला प्रश्न विचारावे.
>
> **- संतोष ढोके, संचालक, पुणे विमानतळ.**

### उपाययोजना काय?

- » पक्ष्यांना पांगविण्यासाठी पाच सदस्यांचे पथक
- » मोठा आवाज निर्माण करणाऱ्या उपकरणांचा (हाय डेसिबल झोन गन) अवलंब
- » पक्ष्यांचा अधिवास कमी करण्यासाठी धावपट्टीजवळील गवताची छाटणी
- » धावपट्टी आणि विमानतळ परिसरात सकाळ-संध्याकाळ गस्त घालणे
- » धावपट्टीच्या परिसरात फटाके फोडणे

# पावणेदोन लाख नोंदणी प्रमाणपत्रे धूळ खात

## पत्ते चुकीचे, अपूर्ण पत्ता, मोबाईल न उचलणे यांमुळे वाटपात येतात अडचणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन मंडळाच्या कार्यालयाबरोबरच शहरातील विविध पोस्ट कार्यालयांत गेल्या दहा वर्षांमध्ये जवळपास पावनेदोन लाख नोंदणी प्रमाणपत्रे धूळ खात पडून आहेत. त्याचे वितरण करण्यासाठी दोन्ही संस्थांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. पत्ता न सापडणे, तसेच सदनिका बदलणे, अपूर्ण पत्ता अशा विविध कारणांमुळे गेल्या काही वर्षांत १ लाख ७५ हजार रजिस्टर सर्टिफिकेट ( नोंदणी प्रमाणपत्र) धूळ खात पडून आहेत.




पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ ) ते येऊन पडतात. त्यातील सुमारे ५० हजार नोंदणी प्रमाणपत्रे वाहनमालक घेऊन गेले आहेत. तर बाकीचे गठ्ठे आरटीओ कार्यालयात पडून आहेत. त्यानुसार संबंधित वाहनमालक आल्यानंतर त्यांचे वाटप करण्यात येते. परिवहन विभागाकडून २०१२ पासून स्मार्ट कार्ड स्वरूपात आरसी देण्यास सुरुवात करण्यात आली. संबंधितांनी आरसीचे स्मार्ट कार्ड काढताना उपप्रादेशिक परिवहन मंडळाने घालून दिलेल्या नियमांची खबरदारी घेतली तर प्रत्येकाला नोंदणी प्रमाणपत्र (आरसी) घरपोच मिळण्यास मदत होईल.

अगोदर ही आरसी वाहन विक्रेत्याकडून मिळत असे. मात्र स्मार्ट आरसी सुरू झाल्यापासून पोस्टाद्वारे संबंधित वाहनधारकास त्यांच्या पत्त्यावर पाठवले जात आहे. मात्र पत्ता सापडला नाही. घर बंद आदी कारणासाठी दरवर्षी हजारोंच्या घरात आरसी परत येत आहेत. २०२२-२३ वर्षांमध्ये १३ हजार ८७२ तर २०२३-२४ या वर्षात १२ हजार ३८४ आरसी पोस्टातून आरटीओकडे आली आहेत. आरसी कार्ड छत्रपती संभाजीनगर येथून विविध पोस्टातून वितरित केली जातात. त्यानंतर पोस्टमन पत्यावर जाऊन ती पोहोचवतात. मात्र आरसी परत येण्याचे प्रमाण दरवर्षी वाढत आहे.

> अनेक वाहनमालक यांनी दिलेला मोबाईल नंबर तपासून पाहणे आवश्यक आहे. तसेच आधार कार्ड आणि त्यावरील मोबाईल नंबर चेक करणे आवश्यक आहे. स्मार्ट कार्ड तयार होऊन आले की, ते पोस्टाद्वारे संबंधित वाहनमालकाच्या घरी देण्यात येते. काही वाहनचालक हे पोस्टातून किंवा आरटीओ कार्यालयातून ती घेऊन जाण्याचा मार्ग निवडतात. त्यांना ती कार्ड व्यवस्थित वितरित होतात. मात्र नोंदणी प्रमाणपत्रावर दिलेले नंबर चुकीचे असल्यामुळे तसेच पत्ते चुकीचे असल्यामुळे संबंधित कार्ड वितरित करताना अडचणी निर्माण होतात.
>
> **- राहुल जाधव , उपप्रादेशिक अधिकारी, पिंपरी-चिंचवड परिवहन विभाग**

# सायबर गुन्ह्यांची उकल करण्यात पिंपरी चिंचवड राज्यात पहिले!

## पिंपरीत 'सायबर सुरक्षा'; सव्वा वर्षात 90 टक्के गुन्ह्यांची उकल, 135 आरोपी अटकेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

ऑनलाइन फसवणुकीचे प्रकार वाढत असताना पिंपरी-चिंचवड सायबर सेलने मागील सव्वा वर्षात ९० टक्के गुन्ह्यांची उकल करून १३५ आरोपींना अटक केली आहे. फसवणूक झालेल्या अनेक नागरिकांचे पैसे परत मिळवून देण्यात पोलिसांना यश आले आहे. सायबर गुन्ह्यांची उकल करण्यात पिंपरी- चिंचवड राज्यात पहिले असल्याचा दावा पोलिसांनी केला आहे.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत हिंजवडी, तळवडे माहिती व तंत्रज्ञाननगरी (आयटी), पिंपरी, चिंचवड, भोसरी, चाकण औद्योगिक वसाहती आहेत. त्यामुळे सायबर चोरट्यांनी आपला मोर्चा शहराकडे वळवला होता. शेअर बाजारातील गुंतवणुकीचे आमिष, समाजमाध्यमांतील व्हॉट्सअॅप लिंकद्वारे फसवणूक, ऑनलाइन अटकेची भीती, अर्धवेळ नोकरीच्या अमिषाने फसवणूक, कस्टमच्या नावाने धमकी अशा




विविध प्रकारांनी लाखो रुपयांची फसवणूक झाली होती.

याबाबतच्या तक्रारी सायबर पोलीस ठाणे, स्थानिक पोलिसात दाखल केल्या आहेत. त्यामुळे पोलिसांनी या गुन्ह्यांच्या तपासावर लक्ष केंद्रित केले. त्यासाठी स्वतंत्र सायबर पोलीस ठाणे कार्यान्वित करण्यात आले. पोलिसांकडे १ मार्च २०२४ ते ७ जून २०२५ या कालावधीत ४४ गुन्हे दाखल झाले. त्यापैकी पोलिसांनी ९० टक्के गुन्ह्यांची उकल केली. १३५ जणांना अटक केली. कर्जतसारख्या शहराबाहेरील भागातीलही गुन्हे उघडकीस आणले आहेत. कोणत्याही लिंकवर क्लिक करताना किंवा अज्ञात व्यक्तीच्या फोनला प्रतिसाद देताना दक्ष राहावे, असे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे.

**सायबर चोरट्यांपासून बचाव करण्यासाठी 'ही' घ्या काळजी**

अनोळखी लिंक किंवा अॅप डाउनलोड करू नये.

बँक खाते, ओटीपी पासवर्ड कोणालाही देऊ नका.

फोन, इ-मेल, व्हॉट्सअॅपवर आलेल्या आमिषांना बळी पडू नका.

सार्वजनिक वाय-फाय वापरताना आर्थिक व्यवहार टाळावा.

सायबर सुरक्षा अपडेट व अँटिव्हायरस वापरावा.

फसवणूक झाल्यास त्वरित सायबर पोलीस ठाण्यात तक्रार करावी.

**येथे करा तक्रार**

ऑनलाइन फसवणूक झाल्यास WWW.CYBERCRIME.GOV.IN किंवा १९३० या हेल्पलाइनवर संपर्क साधण्याचे आवाहन सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण स्वामी यांनी केले.

### असे आले गुन्हे उघडकीस

**» 'नॅशनल सायबर क्राइम पोर्टल'वर तक्रार येताच ती पत्ता पाहून स्थानिक पोलिसांकडे वर्ग केली जाते. तक्रार येताच बँकेचे खाते गोठवले जाते. कोणत्या खात्यात पैसे वळविले आहेत, याची माहिती काढली जाते. पथके त्यावर काम करतात. तक्रार प्राप्त होताच आठ दिवसांत आरोपींचा शोध घेतला जातो. नागरिकांनी सायबर फसवणूक होताच तत्काळ तक्रार करावी. जेणेकरून लवकर खाते बंद करता येते. त्यामुळे आर्थिक फसवणूक कमी होईल,' असे आवाहन सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे यांनी केले.**


> ऑनलाइन फसवणुकीचे प्रमाण वाढले आहे. सर्वसामान्यांची फसवणूक होत आहे. सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी सूचना केल्या आहेत. गुन्ह्यांची उकल करण्याबरोबरच संशयितांना अटक करून कायदेशीर करवाई केली जात आहे. ही कारवाई प्रभावी ठरत असून, सायबर गुन्हे कमी होण्यास मदत होणार आहे.
>
> **- विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड.**

# नैसर्गिक प्रवाह रोखल्याने 'वॉटर पार्क'

## पीएमआरडीए, एमआयडीसीकडून हिंजवडीतील आयटी पार्कची संयुक्त पाहणी

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्क पावसामुळे वॉटर पार्क बनल्यानंतर अखेर राजकीय नेत्यांसह प्रशासनाला जाग आली. आमदार शंकर मांडेकर यांनी सोमवारी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासह (एमआयडीसी) इतर स्थानिक यंत्रणांसह आयटी पार्कमध्ये संयुक्त पाहणी केली. या वेळी नैसर्गिक प्रवाह रोखले गेल्याने पाणी तुंबत असल्याची बाब स्पष्ट झाली.



आयटी पार्कमधील वाहतूक कोंडी, पाणी साचण्याची समस्या यांची पाहणी सोमवारी करण्यात आली. या वेळी आमदार मांडेकर यांच्यासह 'पीएमआरडीए'च्या मुख्य अभियंता रिनाज पठाण, 'एमआयडीसी'चे मुख्य अभियंता नितीन वानखेडे, हिंजवडी ग्रामपंचायतीचे पदाधिकारी आणि आयटीयन्स उपस्थित होते. यावेळी आयटी पार्क टप्पा दोनमधील डोहलर कंपनीसमोरील रस्त्याची पाहणी करण्यात आली. तिथे पाणी साचण्याची समस्या सर्वाधिक आहे. तिथे एमआयडीसीकडून सांडपाणी वाहिन्या बसविण्याचे काम प्रलंबित आहे. ते तातडीने पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले.

आयटी पार्कमध्ये अनेक मोठे निवासी प्रकल्प आणि कंपन्यांनी पाण्याचे नैसर्गिक प्रवाह रोखले आहेत. यामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्यात अडचणी येत आहेत. याच वेळी काही निवासी प्रकल्प आणि कंपन्यांतून प्रक्रिया न करता सांडपाणी बाहेर सोडले जात आहे. हे पाणी पुढे शेतीजमिनींमध्ये जात आहे. त्यामुळे काही शेतकऱ्यांनी संरक्षक भिंती बांधून पाणी जाण्याचा मार्ग रोखला आहे. त्यामुळे पाणी वाहून न जाता रस्त्यावर साचत आहे. या प्रकरणी निवासी प्रकल्प आणि कंपन्यांवर कारवाई करण्याची शिफारस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला केली जाणार आहे.

### मेट्रोच्या ठिकाणी सर्वाधिक समस्या

» हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोचा मार्ग आयटी पार्कमधील ८ किलोमीटर रस्त्यावर आहे. त्या रस्त्यावर सर्वाधिक समस्या पाहणीवेळी आढळून आल्या. या रस्त्यावर ठिकठिकाणी मेट्रोच्या कामाचे साहित्य आणि राडारोडा पडलेला आहे. या राडारोड्यामुळे सांडपाणी वाहिन्या तुंबत आहेत. याचबरोबर रस्त्याच्या बाजूचे नालेही बुजविण्यात आल्याने पाणी वाहून जाण्यास मार्ग राहिलेला नाही. यामुळे रस्त्यावर पाणी साचत असल्याचे निदर्शनास आले. पुणे आयटी सिटी मेट्रो रेल कंपनीकडून हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोचे काम सुरू आहे. कंपनीने मेट्रोच्या कामाच्या ठिकाणी असलेला राडारोडा तातडीने उचलावा, अशी सूचना करण्यात आली. मेट्रोच्या कामाच्या ठिकाणी रस्त्यांची दुर्दशा झालेली आहे. हे रस्ते व्यवस्थित करावेत, असे निर्देश कंपनीला देण्यात आले.

> काही निवासी प्रकल्प आणि कंपन्यांकडून प्रक्रिया न करता सांडपाणी बाहेर सोडले जात आहे. हे सांडपाणी शेतात जात असल्याने काही शेतकऱ्यांनी पाणी जाण्याचा मार्ग अडविला आहे. हे निवासी प्रकल्प आणि कंपन्यांवर कारवाई केली जाणार आहे. मेट्रोच्या कामाच्या ठिकाणी रस्ते दुरुस्त करण्याचे निर्देश संबंधित कंपनीला दिले आहेत.
>
> - रिनाज पठाण, मुख्य अभियंता, पीएमआरडीए.

> हिंजवडी आयटी पार्कमध्ये नाले, बांधकाम परवानगीसह अनेक मुद्दे आहेत. आयटी पार्कमधील पायाभूत सुविधांची समस्या सोडविण्यासाठी बुधवारी सर्व शासकीय यंत्रणांची बैठक बोलाविली आहे. या बैठकीत सर्व समस्यांचा आढावा घेण्यात येईल. त्यानंतर त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची पावले उचलली जातील.
>
> - डॉ. योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए.


# 'आयटी पार्क'साठीचे प्रकल्प 'कागदा'वरच

## प्रकल्पांसाठी भूसंपादनाची जबाबदारी सहा महिन्यांत तिसऱ्या यंत्रणेवर

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमधील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यात सरकारी लाल फितीचा अडसर निर्माण झाला आहे.महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) आयटी पार्कमधील उड्डाणपुलासह पर्यायी रस्त्यांच्या सुमारे ६५० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे नियोजन केले आहे. या प्रकल्पांसाठी भूसंपादनाची जबाबदारी सहा महिन्यांत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आधी 'एमआयडीसी' आणि नंतर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे (पीएमआरडीए) देण्यात आली. या गोंधळामुळे आयटी पार्कमधील प्रकल्प कागदावरच राहिले आहेत.

हिंजवडी आयटी पार्कमधील वाहतूककोंडीची समस्या दिवसेंदिवस बिकट होत आहे. आयटी पार्कमध्ये वाहनांची संख्या गेल्या काही वर्षांत प्रचंड प्रमाणात वाढली. त्यामुळे सध्याचे रस्ते अपुरे पडू लागले आहेत. त्यातच या रस्त्यांना पर्यायी रस्ते करण्याकडे दुर्लक्ष झाल्याने वाहतूककोंडी ही नित्याचीच बाब आहे. त्यामुळे उड्डाणपुलासह नवीन पर्यायी रस्ते तयार करण्याचा प्रस्ताव आहे. हिंजवडीतील लक्ष्मी चौकात



सातत्याने वाहतूककोंडी होते. ही कोंडी सोडविण्यासाठी या चौकात उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. हा पूल चारपदरी आणि ७२० मीटर लांबीचा असेल. त्यासाठी ४० कोटी रुपयांचा खर्च होणार आहे.

हिंजवडीतील शिवाजी चौक ते स्मशानभूमी या रस्त्याचे रुंदीकरण केले जाणार आहे. हा रस्ता ९०० मीटर लांबीचा आहे. हा रस्ता सहापदरी केला जाणार आहे. यासाठी २४.७४ कोटी रुपये खर्च येणार आहे. याचबरोबर आयटी पार्कमधील टप्पा एकपासून टप्पा तीनला जोडणारा नवीन रस्ता बांधला जाणार आहे. हा रस्ता ५ किलोमीटर लांबीचा असेल आणि त्यासाठी ५८४.१४ कोटी रुपये खर्च येईल.

आयटी पार्कमधील प्रकल्पांसाठीची जागा सार्वजनिक बांधकाम विभाग संपादित करून 'एमआयडीसी'ला देणार होता. परंतु, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत 'एमआयडीसी'नेच हे भूसंपादन करावे, असा निर्णय झाला. सार्वजनिक बांधकाम विभागाने आधी भूसंपादन करून नंतर ही जागा 'एमआयडीसी'ला हस्तांतरित करण्यात वेळ घालवू नये. थेट 'एमआयडीसी'नेच भूसंपादन करून रस्त्यांचे काम सुरू करावे, असे निर्देशही त्या वेळी देण्यात आले होते. यामुळे या प्रकल्पांचे भूसंपादन करण्यासाठी 'एमआयडीसी'कडून प्रशासकीय प्रक्रिया सुरू झाली. त्यानंतर मुख्यमंत्री कार्यालयात झालेल्या बैठकीत या प्रकल्पांसाठीचे भूसंपादन 'पीएमआरडीए'कडे देण्यात आले. गेल्या सहा महिन्यांत केवळ भूसंपादन कोण करणार याचा निर्णय होऊ शकला नव्हता. यामुळे भूसंपादन होऊ शकले नाही आणि हे प्रकल्पही रखडले.